‘घन:श्याम सुंदरा’ ही अमर भूपाळी लिहिणारा होनाजी हा गवळीसमाजात जन्माला आला. तो त्याच्या घराण्याचा दुधाचा व्यवसाय करीत असे. पेशव्यांच्या वाडय़ावर सकाळी दुधाचा रतीब घालणे आणि सायंकाळी लावणी गाऊन, तमाशा करुन प्रसंगविशेषी त्यांचे तसेच इतरेजनांचेही मनोरंजन करणे हे दोन्हीउद्योग होनाजीने केले

त्याचा गवळ्याचा व्यवसाय जसा वंशपरंपरागत तसाच शाहिरीचाव्यवसायही वंशपरंपरागतच. त्याचे आजोबा साताप्पा किंवा शांताप्पा हे आणित्याचा चुलता बाळा हे दोघे नामांकित शाहीर होते. विशेषत: होनाजीचा चुलताबाळा हा बाळा बहिरु या नावाने शाहिरी क्षेत्रात प्रसिद्ध होता. बहिरुनावाचा रंगारी हा बाळाचा मित्र होता आणि ते दोघे बाळा बहिरु या नावानेतमाशाचा फड चालवीत. बाळा बहिरुची हीच परंपरा जणूकाही होनाजीने चालविली.

होनाजीचा साथीदार आणि मित्र बाळा कारंजकर या नावाचा शिंपी होता .. त्याच्या जोडीने होनाजीने आपला तमाशा गाजवला आणि होनाजी बाळा हेजोडनाव रुढ केले. होनाजीचे खास वैशिष्ट्य असे की, त्याने तमाशालाबैठकीतल्या शास्त्रीय गाण्याचे स्वरुप आणून देण्याचा प्रभावी प्रयत्न केला.तमाशा- लावणीला तबल्याच्या ठेक्याची साथ देणे, होनाजीने सुरु केले.

येथे होनाजी बाळा यांच्या काव्य प्रतिभेबद्दल व त्यांच्या साहित्यातील योगदानाबद्दलही थोडक्यात यावे असे वाटते.

संदर्भ:

http://www.globalmarathi.com/KathaVacha.aspx?BlogId=4900633867731303118&OId=5502788118444389516